नि.फौ.प्र.क्र.१७८/२०२० निशाणी क्र.२९

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन</u>**

नाव – सत्यवान किसन मोरे वय – ४५ वर्षे

राहणार – गणोरे, ता.अकोले, जि.अहमदनगर.

प्र.१ तुम्हाला विचारण्यात येणा–या प्रश्नांची उत्तरे देण्यास तुम्ही बांधील नाही, जर प्रश्नाचे उत्तर चुकले तर त्यासाठी तुम्हाला कोणतीही शिक्षा होणार नाही, पण तुम्ही दिलेली उत्तरे ही विचारात घेतली जातील, हे समजले काय ?

उत्तर होय.

प्र.२ साक्षीदार क्र.२ पोलीस नाईक श्री.आर.एस.वलवे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०२.०८.२०२० रोजी ते, पो.ना.गोराणे, पो.कॉ.पर्बत असे पोलीस ठाण्यात हजर असताना पोलीस निरीक्षक जोंधळे यांनी गणोरे गावच्या शिवारात नदीचे काठावर लाल रंगाचा ट्रॅक्टर व त्यास जोडलेले राखाडी रंगाची ट्रॉली याद्वारे वाळू भरत आहेत, अशी माहिती देवून कारवाईकामी त्यांना सांगितले. त्यामुळे, ते सर्वजण खाजगी वाहनाने गणोरे गावच्या शिवारातील आढळा नदीचे तीरावर गेले होते. नदीवर साधारण १८.०५ वाजता गेले असता त्यांना असे दिसून आले की, लाल रंगाचा ट्रॅक्टर त्याला राखाडी रंगाची ट्रॉली असलेली पुलावरून जात होता व लगेचच त्यावरील चालक त्यांना पाहिल्यावर ट्रॅक्टरवरुन उडी मारुन पळून गेला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.३ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, ते ट्रॅक्टरच्या दिशेने जावून त्या ट्रॅक्टरजवळ गेले. त्यांनी ट्रॅक्टर व ट्रॉलीचे निरीक्षण केले असता त्यांना त्या ट्रॉलीमध्ये १ ब्रास वाळू दिसून आली. त्या ट्रॅक्टरचा क्र.एम.एच.१४–एम.८१३३ असा होता. तसेच ट्रॉलीचा क्र.एम.एच.१४–ए.व्ही.९०१२ असा होता. त्यानंतर त्यांनी ट्रॅक्टर व ट्रॉली ताब्यात घेवून दुस–या ड्रायव्हरच्या मदतीने पोलीस ठाण्यात आले. त्यानंतर त्यांनी चालकाबाबत लोकांकडे चौकशी केली असता चालकाचे नाव सत्यवान किसन मोरे, रा.गणोरे म्हणजेच तुम्ही असल्याचे त्यांना समजले. त्यांनी आर्टिकल 'अ' व 'अ–१' वरील ट्रॅक्टर व ट्रॉलीचे फोटो ओळखले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खरे आहे.

प्र.४ साक्षीदार क्र.३ कुलदीप किशोर पर्बत यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०२.०८.२०२० रोजी ते अकोले पोलीस ठाणे येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होते. त्या दिवशी पोलीस निरीक्षक श्री.जोंधळे यांनी त्यांचे कॅबीनमध्ये बोलावून सांगितले की, गणोरे गावामध्ये आढळा नदीच्या काठावर अवैध वाळूचा उपसा सुरु आहे. तेथे जावून कारवाई करा. त्यानंतर ते, पो.ना.गोराणे, पो.कॉ.वलवे व पो.कॉ.सानप असे मिळून खाजगी वाहनाने संध्याकाळी ०६.०० वाजताचे सुमारास गणोरे येथे आढळा नदीजवळ गेले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खरे आहे.

प्र.५ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तेथे गेल्यानंतर त्यांना एक महिंद्रा कंपनीचा लाल रंगाचा ट्रॅक्टर क्रमांक एम.एच.१४–एम.८१३३ व राखाडी रंगाची ट्रॉली क्रमांक एम.एच.१४–ए.व्ही.९०१२ दिसून आली.

त्या ट्रॉलीमध्ये वाळू भरत असल्याचे दिसले. ते त्या ठिकाणी कारवाई करण्यासाठी गेले असता त्यांचा सुगावा लागल्याने त्या ट्रॅक्टरचा चालक तेथून पळून गेला. त्यांनी चौकशी केली असता त्या ट्रॅक्टरचा चालक सत्यवान किसन मोरे, रा.गणोरे म्हणजेच तुम्ही असल्याचे समजले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.६ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्या ट्रॉलीमध्ये एक ब्रास वाळू आणि तीन फावडे व पाच पाट्या असे साहित्य मिळून आले. त्यांनी तो ट्रॅक्टर व ट्रॉली त्यातील वाळू व इतर साहित्य या सह एका खाजगी चालकाच्या मदतीने अकोले पोलीस ठाणे येथे आणले. पो.कॉ.श्री.सानप यांनी घडलेल्या घटनेबाबत फिर्याद दाखल केली. तपासिक अंमलदार यांनी त्यांचे तपास टिपण नोंदविले आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.७ साक्षीदार क्र.४ किसन बाबुराव सानप यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०२.०८.२०२० रोजी ते अकोले पोलीस ठाणे येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होते. त्या दिवशी पोलीस निरीक्षक श्री.जोंधळे यांनी त्यांना, पो.ना.गोराणे, पो.कॉ.वलवे व पो.कॉ.पर्बत यांना त्यांचे कॅबीनमध्ये बोलावून सांगितले की, गणोरे गावाचे शिवारामध्ये आढळा नदीच्या काठावर काही इसम ट्रॅक्टरमध्ये अवैधरित्या वाळू भरीत आहेत, अशी माहिती मिळाली असून तुम्ही तेथे जावून कारवाई करा. त्यानंतर ते सर्वजण खाजगी वाहनाने संध्याकाळी १८.०५ वाजताचे सुमारास गणोरे येथे आढळा नदीजवळ गेले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.८ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांना आढळा नदीच्या पुलावर समोरून एक ट्रॅक्टर येताना दिसला. त्या ट्रॅक्टरला विना नंबरची ट्रॉली जोडलेली होती. त्यांनी त्या ट्रॅक्टर चालकाला थांबण्याचा इशारा केला. परंतु, तो थांबला नाही. त्या ट्रॅक्टर चालकाने तो ट्रॅक्टर थोडे पुढे जावून रस्त्याच्या कडेला थांबविला व तो ट्रॅक्टर चालक झाडाझुडुपात पळून गेला. त्यांनी तेथे जावून त्या ट्रॅक्टर व ट्रॉलीची पाहणी केली. तो ट्रॅक्टर लाल रंगाचा होता. त्या ट्रॅक्टरला क्रमांक नव्हता. त्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये सुमारे एक ब्रास वाळू, तीन लोखंडी फावडे व पाच फायबरच्या पाट्या होत्या, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.९ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी चौकशी केली असता त्या ट्रॅक्टरचा चालक सत्यवान किसन मोरे, रा.गणोरे म्हणजेच तुम्ही असल्याचे समजले. त्यांनी तो ट्रॅक्टर व ट्रॉली त्यातील वाळू व इतर साहित्य या सह एका खाजगी चालकाच्या मदतीने अकोले पोलीस ठाणे येथे आणले व त्यांनी तुमचेविरुध्द अकोले पोलीस स्टेशनमध्ये निशाणी पी–२० वरील फिर्याद दाखल केली. त्यानुसार निशाणी पी–२१ वरील प्राथमिक खबरी अहवाल नोंदविण्यात आला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१० साक्षीदार क्र.५ बाबासाहेब बन्सी भोसले यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०२.०८.२०२० रोजी ते अकोले पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होते. त्या दिवशी पोलीस निरीक्षक श्री.जोंधळे यांचे निशाणी पी–२३ वरील लेखी आदेशान्वये

गु.र.नं.३३३/२०२० चा तपास त्यांच्याकडे वर्ग झाला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.११ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी संबंधित साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. त्यांनी निशाणी पी–२४ वरील मुद्देमाल पावती तयार करून गुन्हयातील मुद्देमाल संबंधित कारकून यांचे ताब्यात दिला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१२ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी तहसिलदार, अकोले यांना निशाणी पी–२५ वरील पत्र देवून गुन्हयातील मुद्देमाल वाळू ताब्यात घेण्याबाबत व पुढील कार्यवाही करणेबाबत विनंती केली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१३ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तपासाअंती गणोरे, ता.अकोले, जि.अहमदनगर येथील आढळा नदीच्या पात्रातून तुम्ही विनापरवाना व बेकायदेशीररित्या वाळूची चोरी करून ती वाळू वाहतूक करीत असताना मिळून आल्याने त्यांनी तुमचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१४ साक्षीदार क्र.६ बाळासाहेब विठ्ठल गोराणे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०२.०८.२०२० रोजी ते अकोले पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होते. त्या दिवशी पोलीस ठाणे अंमलदार श्री.वाय.एल.हासे यांनी गु.र.नं.३३३/२०२० दाखल करुन घेवून वरिष्ठांच्या निशाणी पी–२३ वरील लेखी आदेशान्वये गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे वर्ग केला. त्या आदेशासोबत त्यांना फिर्याद,

एफ.आय.आर.ची प्रत व दैनिक अहवाल ही कागदपत्रे प्राप्त झाली. त्यांनी त्या कागदपत्रांचे अवलोकन केले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१५ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्याच दिवशी ते घटनास्थळी गेले. ते घटनास्थळ फिर्यादी पो.कॉ.श्री.किसन बाबुराव सानप यांनी दाखविले. घटनास्थळी महिंद्रा कंपनीचा एक ट्रॅक्टर व ट्रॉली होती. त्या ट्रॉलीमध्ये अंदाजे १ ब्रास वाळू, फावडे व फायबरच्या टोक–या होत्या. त्यांनी दोन पंचांसमक्ष निशाणी पी–२८ वरील घटनास्थळाचा दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा तयार केला. त्यानंतर या गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री.बी.बी.भोसले यांनी केला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१६ तुम्हाला शपथेवर जबाब द्यायचे आहेत काय ?

उत्तर नाही.

प्र.१७ तुम्हाला साक्षीदार तपासावयाचे आहेत काय ?

उत्तर नाही.

प्र.१८ तुम्हाला केसबद्दल आणखी काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर माझ्याविरुद्ध खोटी केस दाखल केली आहे.

----------------

आरोपी

समक्ष

25.3.2026

**(डी.एम.हिंग्लजकर)**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले**

**दिनांक – २५.०३.२०२६**

**<u>प्रमाणपत्र</u>**

वर नमुद आरोपीचा जबाब माझे समक्ष त्याच्या सांगणेप्रमाणे खरा व बरोबर नोंदविणेत आला आहे.

समक्ष

25.3.2026

**(डी.एम.हिंग्लजकर)**

**दिनांक – २५.०३.२०२६**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले**